Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २ ] बुधवार, मार्च २४, २०२१/चैत्र ३, शके १९४३ [पृष्ठे ०३, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

**संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश**

भाग १ (असा.) (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ४.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), यांजकडून**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, कलम १९(१) अन्वये.**

क्रमांक मं.अ.-उजिभूक्र.-कावि-९३-२०२१.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या अधिका-याने भूमिसंपादन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक उजिभू-मं.अं.-कावि-३६७-२०२० अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे कुटूंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची—एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १७-अ-६५-२०१८-१९, गावाचे नाव कोंटगाव, तालुका मौदा, जिल्हा नागपूर, प.ह.नं. ६९.

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३ | ० ६२ |
| २ | ७८/२ | ० ०२ |
| ३ | ७८/३ | ० ३० |
| ४ | ७८/४ | ० २२ |
| ५ | ८९ | १ ०१ |
| ६ | ९० | ० १० |
| ७ | ९१ | ० २५ |
| ८ | ९२/१, ९२/२ | १ ९० |
| ९ | ९७/१, ९७/२ | १ ३२ |
| १० | ९८ | १ १४ |
| ११ | ९९/१ | ० ८२ |
| १२ | ९९/२/अ | ० १७ |
| १३ | ९९/२/ब | ० ९५ |
| १४ | १०८/१ | ० ०५ |
| १५ | ११५/१ | ० १८ |
| १६ | ११५/२/अ, ११५/२/ब | ० ३७ |
| १७ | ११५/३ | ० ३७ |
| १८ | ११५/४ | ० १८ |
| १९ | १२२/१ | १ २० |
| २० | १२२/२ | ० ९८ |
| २१ | १३० | ० ९९ |
| २२ | १३१/१अ, १३१/२ | ० ६५ |
| २३ | १३२ | ० ३३ |
| २४ | १३३ | ० ५६ |
| २५ | १३४ | ० ४० |
| २६ | १३५ | १ ४७ |
| २७ | १३६ | ० ९९ |
| २८ | १३७/१ | ० ०७ |
| २९ | १३८/१ | ० १५ |
| ३० | १३८/२/अ | ० ४४ |
| ३१ | १३९ | ० ३१ |
| ३२ | १४२ | ० २१ |
| ३३ | १४३/१ | ० ६२ |
| ३४ | १४४/१ | ० ७२ |
| ३५ | १४५/१/अ, १४५/१/ब | ० २४ |
| ३६ | १४५/२, १४५/३ | १ १३ |
| ३७ | १४७/१ | ० १२ |
| ३८ | १४७/३ | ० ६० |

**अनुसूची—एक**—चालू

| (१) | (२) | (३) हे. आर |
|---|---|---|
| ३९ | १४८ | ० २४ |
| ४० | १४९/१, १४९/२ | ० १७ |
| ४१ | १५० | ० १६ |
| ४२ | १५१ | ० २२ |
| ४३ | १५२/१ | ० ११ |
| ४४ | १५२/१/अ | ० ०७ |
| ४५ | १५२/३ | ० १८ |
| ४६ | १५३/१ | १ १७ |
| ४७ | १५३/२ | ० ४२ |
| ४८ | १५४/१, १५४/२ | ० १४ |
| ४९ | १५५/१ | ० ०६ |
| ५० | १५५/२ | ० ०७ |
| ५१ | १६०/१/अ, १६०/१/ब, १६०/१/क, १६०/१/ड, १६०/२/अ | ० ६७ |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | २५ ८३ |

**अनुसूची—दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :— गोसीखुर्द प्रकल्प.

प्रकल्पाचे कामाचे विवरण :— गोसेखुर्द पुनर्वसन विभाग योजनेअंतर्गत मौजा कोटगाव येथील बुडीत क्षेत्राअंतर्गत खाजगी जमिनीच्या अतिरिक्त जमिनीचा भूसंपादन.

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे :— सदर प्रकल्पामुळे चंद्रपूर, भंडारा व नागपूर जिल्ह्यातील सुमारे १९०००० हेक्टर (निव्वळ) क्षेत्रात सिंचनाचा लाभ मिळेल तसेच गोसेखुर्द प्रकल्पातील निव्वळ ८३७ द.ल.घ.फु. (बाश्पी भवनाचा व्यय सोडून) पाणी भंडारा येथील सैनीक साहित्य तयार करण्याच्या (ऑडनर्न्स) कारखान्याला देण्यात येणार आहे.

**अनुसूची—तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही : निरंक.

**अनुसूची—चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

(१) कार्यकारी अभियंता, गोसेखुर्द पुनर्वसन विभागीय पथक, नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक ६८-गोपूविप-चिशा-२०१८, दिनांक ०७-०१-२०१९.

(२) महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.ओ.एस.-१०८१-२६८१-डब्ल्यूआर-२, मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१-०३-१९८३, संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ व तद्नंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

**टीप.**—उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्रमांक २), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**श्रीमती शितल देशमुख,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्रमांक २),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

नागपूर :
दिनांक १९ मार्च २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.